रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ११४ ▌पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹



## बेकायदेशीर इमारतींवर 'सर्वोच्च' स्थगिती

**उरण :** चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील चिंतामणी गृहसंकुलासंदर्भातील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबरपर्यंत लांबणीवर टाकली आहे. त्यामुळे १०८ फ्लॅटधारकांच्या डोक्यावरचे बेघर होण्याचे संकट काही काळासाठी मागे सरकले आहे. सिडकोच्या आरक्षित भूखंडावर बिल्डर विनायक कोळी व विवेक देशमुख यांनी धडधडीत चार बेकायदेशीर इमारती उभ्या केल्या आहेत. या अनधिकृत कारभाराला ११ वर्षांनी न्यायालयीन आव्हान मिळाले आणि कारवाईची तलवार थेट रहिवाश्यांच्या माथी आली. २७ जून रोजी सिडकोचे पथक पोलिस बंदोबस्तात इमारतींची पाहणी करण्यासाठी धडकले होते.

आदर्श एक विश्वास

आदर्श पतसंस्था अलिबाग

9350000000

एकत्रित व्यवसायाचा ऐतिहासिक टप्पा

रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी सक्षम पतसंस्था!

हे शक्य झालं... केवळ आपण आमच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळेच!

मन:पुर्वक आभार!

संस्थेच्या २७ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा!



श्री. अभिजीत पाटील – अध्यक्ष
श्री. सुरेश पाटील – संस्थापक व संचालक
श्री. कैलास जगे – उपाध्यक्ष



श्री. अनंत म्हात्रे – संचालक
श्री. सतीश प्रधान – संचालक
ॲड. श्री. आत्माराम काटकर – संचालक
श्री. विलाप सरतांडेल – संचालक
ॲड. डॉ. सौ. रेश्मा पाटील – संचालिका
ॲड. सौ. वर्षा शेठ – संचालिका
श्री. भगवान वेटकोळी – संचालक



श्री. रामभाऊ गोरीवले – संचालक
श्री. महेश चव्हाण (M.E.) – संचालक
श्री. श्रीकांत ओसवाल – संचालक
श्री. संजय राऊत (CA) – तज्ञ संचालक
डॉ. श्री. मकरंद आठवले – तज्ञ संचालक
सौ. मिनाक्षी पाटील – कार्यलक्षी संचालिका

सर्व कर्मचारी वृंद



स्कॅन करा आणि आदर्श परिवारामध्ये सहभागी व्हा.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे चई, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| जानकुबाई गोमा शिंगोळ | २१ | २ | २-९७-०० | १ | १२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०१/१०/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.नितीन नारायण निकम, रा.३०२, मेघहान सी.एच.एस., प्लॉट नं २८, सेक्टर ४२ए, सीवूड्स, नेरूळ वेस्ट नवी मुंबई, ठाणे ४००७०६ यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे आसरे, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १८ | २-०८-० | ०-८६ |
| | पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ०-६८-०० हे. आर. पैकी ०-२०-०० | ०.२९ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०१/१०/२०२५

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे मालकांकडून खरेदी करण्याचा आमच्या अशिलांचा मानस आहे व त्या संबंधी उभयतांत वाटाघाटी सुरु आहेत. विद्यमान मालकांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतींचे त्यांचे मालकी हक्क निर्वेध व निजोखमी तसेच बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| अ नु. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | किहीम | १५८ | ०-२०-६० पो.ख.०-०२-९० ०-२३-५० | रु.२.१९ | श्री. विवेकानंद गजानन पाटील. |
| २. | किहीम | १५९ | ०-२२-०० पो.ख.०-०३-०० ०-२५-०० | रु.२.३७ | सौ.अमृता विवेकानंद पाटील, |

तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, अदलाबदल, भेट, वाटप, देखभाल, धारणाधीकार, वारसा, मृत्युपत्र, ट्रस्ट, भाडेपट्टा हक्क किंवा इतर कोणताही हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात कळवावे. नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, वर नमुद मिळकतींसंदर्भात अन्य कुणाचेही हक्क अधिकार नाहीत व असल्यास ते सोडून दिले आहेत, असे गृहीत धरले जाईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १/१०/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - नागेवाडी, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १) अंकुश रघुनाथ घोडविंदे २) ज्योत्स्ना अंकुश घोडविंदे ३) सतिश रघुनाथ घोडविंदे | ६/१/अ | एकूण क्षेत्र ५-६०-०० त्यापैकी लिहून देणार यांचे हिश्यास असलेले क्षेत्र ०-८८-५० हे.आर.पॉ त्यापैकी लिहून दिलेले प्लॉट नं.२९ चे क्षेत्र ०-२०-०० हे.आर.पॉ | ०-१६ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. १/१०/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या आशीलांनी मौजे-वाशी, ता.रोहा, जि.रायगड येथील, श्री.हेमंत महादेव ठाकूर, रा.यशवंतखार, ता. रोहा यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या जमिन मिळकती खरेदी करण्याचे ठरवले आहे.

**- : मिळकतींचे वर्णन :-**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वाशी, ता.रोहा, जि.रायगड | ८४/ब | जिरायत ०-१७-६० पो.ख ०-००-८० एकूण क्षेत्र ०- १८-४० | ३.९० |
| | ८४/अ | जिरायत ०-१८-९० पो.ख.०-०१-१० एकूण क्षेत्र ०-२०-०० | ४.१८ |

तरी वर वर्णन केलेली मिळकती विद्यमान मालकांचे ताबेकब्जा वाहिवाटीत, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी माझ्या अशीलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागवून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- २९/०९/२०२५

सही/-
**ॲड. नितेश पी. ठाकूर**
मो. ८९८३४५८३६०

(कार्यालयीन पत्ता : ठाकूर अँड असोसिएटस, ए २०३, वसंतपुष्प को. ऑप. हौ.सो. लि. अलिबाग रायगड )

## उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगांव यांजकडून शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/रातवड/एसआर-९४/२०१२ दुरुस्ती, उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/एसआर-९४/२०१२ दिनांक ०४/०८/२०१६, ०५/०६/२०१८ व २५/०४/२०१९ अन्वये मौजे-रातवड, ता. माणगांव, जिल्हा-रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) च्या अधिसूचना स्थानिक वर्तमानपत्रात सन २०१६ ते २०१९ रोजी प्रसिद्ध झालेल्या आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसुचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०२०/प्र.क्र.४६/उद्योग-१४ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ अन्वये मौजे-रातवड, ता.माणगांव, जि.रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील काही सर्व्हे नंबर मधील हिस्से व क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार व पृष्ठ क्रमांक २ ते ३ वर दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहिर केले आहे.
त्याअर्थी, स्थानिक वर्तमानपत्रात सन २०१६ ते २०१९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(१) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**
**पाणसई औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा - रायगड, ता. माणगांव, गांव- रातवड**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| २१५ | ० | १.३२०० | २१५ | अ | ०.८९०० |
| | | | २१५ | ब | ०.४३०० |
| ३४१ | ० | ३.३४०० | ३४१ | ० | ३.३४७० |
| ४०७ | ० | १.३५१० | ४०७ | ० | १.२०१० |

ठिकाण - माणगांव
**दिनांक : २३/०९/२०२५**

**सही/-**
**(डॉ.संदीपान सानप )**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग माणगांव**

## सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यःस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | |
| १ | खारघर २९(४) | खारघर ३७० | ४६/६अ<br>१३०/४<br>१३०/९<br>३१८/२<br>३२६/८<br>३२६/१०<br>३९३/२<br>४०७/१ | ०-१२-०<br>०-०५-०<br>०-११-०<br>०-०५-०<br>०-१८-०<br>०-१६-०<br>२-५५-०<br>०-५०-० | ३३०० चौ.मी. पैकी १०० चौ.मी. | भूखंड क्र. १५३, सेक्टर-३०, क्षेत्र-१०० चौ.मी. | श्री. मनोहर नारायण पाटील | निरंक |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | **३-७२-०** | | | | |
| २ | तळोजा ३०६ | तळोजा-पाचनंद ८५+८६ | ३८/३<br>९२/२B | ०-२५-०<br>१-०६-० | ११५० चौ.मी. पैकी १५० | भूखंड क्र. १४१, सेक्टर-२, क्षेत्र-१५० चौ.मी. | १) दत्तात्रेय काळया उर्फ काळूराम गायकवाड उर्फ गायकर<br>२) बाळकृष्ण काळया उर्फ काळूराम गायकवाड उर्फ गायकर<br>३) प्रशांत हरीदास गायकवाड उर्फ गायकर | - |
| | | | एकूण क्षेत्र | १-३१-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
१२.५ टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**
**सिडको/जनसंपर्क/२७५/२०२५-२६**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगांव यांजकडून शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/घोटवळ/एसआर-६४/२०१२ दुरुस्ती, उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/एसआर-९५/२०१२ दिनांक २६/०३/२०१५, २१/०४/२०१६, ०८/०७/२०१६, ०४/०८/२०१६ व २५/०४/२०१९ अन्वये मौजे- घोटवळ, ता.माणगांव, जिल्हा - रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) ची अधिसूचना स्थानिक वर्तमान पत्रात सन - २०१५ ते २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०२०/प्र.क्र.४६/उद्योग-१४ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ अन्वये मौजे घोटवळ, ता. माणगांव, जि. रायगड येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील काही सर्व्हे नंबर मधील हिस्से व क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार व पृष्ठ क्रमांक ०२ मध्ये दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी जाहिर केले आहे.
त्याअर्थी, स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१५ ते २०१९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(१) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**
**पाणसई औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा -रायगड, ता. माणगांव, गांव-घोटवळ**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) | सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| १६९ | ० | ०.२६५० | १६९ | पै | ०.१८५० |
| १७१ | ० | १.०००० | १७१ | पै | ०.३००० |
| १८४ | ० | ०.९४०० | १८४ | पै | ०.८९०० |
| १९२ | ० | ३.२००० | १९२ | पै | ०.५५०० |
| २१६ | १ | ४.१३०० | २१६ | १ | ४.२४०० |
| २३६ | ० | १.०७०० | २३६ | पै | ०.६२०० |
| २३८ | ० | ०.६८५० | २३८ | पै | ०.५८५० |
| २४६ | पै | ०.३००० | २४६ | ० | ०.३००० |

ठिकाण - माणगांव
दिनांक २३/०९/२०२५

सही/-
**(डॉ.संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग माणगांव**

## उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगांव यांजकडून शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/निळज/एसआर-६६/२०१२ दुरुस्ती, उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा /भूसं /कात-२ एसआर- ६६/२०१२ दिनांक २४/०५/२०२२ अन्वये मौजे- निळज, ता. माणगांव, जिल्हा-रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (१) ची अधिसूचना स्थानिक वर्तमानपत्रात सन २०२२ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे प्रकरण ६, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसुचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०२०/प्र.क्र.४६/उद्योग-१४ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ अन्वये मौजे निळज ता.माणगांव, जि.रायगड येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील काही सर्व्हे नंबर मधील हिस्से व क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार व पृष्ठ क्रमांक ०३ वर दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहिर केले आहे.

त्याअर्थी, स्थानिक वर्तमानपत्रात सन- २०२२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(१) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**
**पाणसई औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा - रायगड, ता. माणगांव, गांव - निळज**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र(हे.आर) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| २३७ | ० | ०.८४०० | २३७ | पैकी | ०.८४०० |
| २३७ | ० | ०.२७०० | २३७ | पैकी | ०.२७०० |
| २४९ | १ | ०.०८०० | २४९ | अ | ०.०८०० |
| २४९ | २ | ०.०४०० | २४९ | ब | ०.०४०० |

ठिकाण- माणगांव
दिनांक : २३/०९/२०२५

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग माणगांव**

## उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगांव यांजकडून शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/पाणसई/एसआर-९७/२०१२ दुरुस्ती, उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक /उविअमा भूसं/कात-२/एसआर-९५/२०१२ दिनांक २६/०३/२०१५, २६/०४/२०१६, १४/११/२०१७, १९/०३/२०१८ व २४/०५/२०२२ अन्वये मौजे-पाणसई, ता. माणगांव, जिल्हा-रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) ची अधिसूचना स्थानिक वर्तमान पत्रात सन-२०१५ ते २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०२०/प्र.क्र.४६/उद्योग-१४ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ अन्वये मौजे-पाणसई, ता.माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील काही सर्व्हे नंबर मधील हिस्से व क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार व पृष्ठ क्रमांक ०४ ते ०६ मध्ये दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहिर केले आहे.

त्याअर्थी, स्थानिक वर्तमानपत्रात सन २०१५ ते २०२२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(१) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**
**पाणसई औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा-रायगड, ता. माणगांव, गांव-पाणसई**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) | सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| १ | २ पै | ०.०४५० | १ | २ | ०.०४५० |
| १ | ५ पै | ०.०८२० | १ | ५ | ०.०८२० |
| ३१ | १३ पै | ०.२५९० | ३१ | १३ | ०.२६०० |
| ५० | पै | ०.९१८० | ५० | ० | ०.९१८० |
| ६४ | ३ पै | ०.२३०० | ६४ | ३ | ०.२३५० |
| ६६ | २ | ०.०९६० | ६६ | २/७ | ०.०९६० |
| १३३ | १३ | ०.६२०० | १३३ | १३ | ०.८२०० |
| १४५ | १अ | ४.६३०० | १४५ | १ | ४.६३०० |
| १४९ | ४१ | ०.१३५० | १४९ | ४१ | ०.१२०० |
| १७८ | ११अ | १.५८०० | १७८ | ११अ | १.४८०० |
| १९० | ७ अ पै | ०.६००० | १९० | ७ | ४.२४०० |
| १९० | ७ पै | ३.६४०० | | | |
| २४१ | २ पै | ०.०२१० | २४१ | २ | ०.१२१० |

ठिकाण - माणगांव
दिनांक : २३/०९/२०२५

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग माणगांव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल अझर मुर्तुझा गांगू, रा. खोपोली पेण रोड, डोणवत, ता. खालापूर, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - कशेळे, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| उर्मिला विजय जाधव | ५३ | २/२ | २८६.०० | २८.६० |

सदरची बिनशेती जमीन मिळकत ही वरील मालकांची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ल लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. ०१/१०/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्बल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगांव यांजकडून शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/दाखणे/एसआर-७०/२०१२ दुरूस्ती, उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक उविअमा/भूसं/कात-२/एसआर- ७०/२०१२ दिनांक १२/०२/२०१३, अन्वये मौजे दाखणे, ता.माणगांव, जिल्हा-रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (२) ची अधिसूचना स्थानिक वर्तमान पत्रात सन-२०१३ रोजी प्रसिद्ध झालेली आहे;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०२०/प्र.क्र.४६/उद्योग-१४ दिनांक ०७ ऑगस्ट २०१५ अन्वये मौजे-दाखणे, ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील काही सर्व्हे नंबर मधील हिस्से व क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार ब पृष्ठ क्रमांक ७ ते १० वर दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहिर केले आहे.

त्याअर्थी, स्थानिक वर्तमानपत्रात सन २०१३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(२) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**
**पाणसई औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा - रायगड, ता. माणगांव, गांव- दाखणे**

| यापूर्वीचा तपशील | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र(हे.आर) | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र(हे.आर) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| १४ | २ | ०.०४८० | १४ | २ | ०.०९९० |
| १९ | अ | ०.३६७० | १९ | ३+७+१० | ०.७३४० |
| १९ | ब | ०.३६७० | | | |
| ९७ | ५ | ०.०२१० | ९७ | ५ | ०.१२०० |
| ९९ | ३० | ०.०२०० | ९७ | ३० | ०.११०० |
| ९७ | ३६ | १.२७०० | ९९ | ३२ | ०.००३० |
| १११ | ३३ | ०.१८०० | ९७ | ३६ | ०.२७०० |
| ११२ | २८ | ०.४६०० | १११ | ३३ | ०.२८०० |
| ११३ | २४ | ०.०४०० | ११२ | २८ | ०.५३०० |
| ११३ | ३२ | ०.४८०० | ११३ | २४ | ०.१३०० |
| ११५ | ३३अ | ०.३४०० | ११३ | ३२ | ०.४९०० |
| ११५ | ३३ब | ०.२१०० | ११५ | ३३ | ०.९५०० |
| ११५ | ३३क | ०.२२०० | | | |
| ११६ | १८ | ०.४६०० | ११६ | १८ | ०.२६०० |
| ११६ | २४ | ०.०२०० | ११६ | २४ | ०.१७०० |
| ११६ | ५८ | ०.५४०० | ११६ | ५८ | ०.५५०० |
| ११७ | ३६अ | ०.७७०० | ११७ | ३६ | १.०१०० |
| ११७ | ३६ब | ०.२१०० | | | |
| ११७ | ३६क | ०.४००० | | | |
| ११७ | ४७ | ०.४२०० | ११७ | ४७ | ०.१५०० |
| ११७ | ५९ | ०.३४०० | ११७ | ५९ | ०.२४०० |
| १२१ | १० | ०.७१०० | १२१ | १० | ०.६५०० |
| १२१ | ११अ | ०.४८०० | १२१ | ११ | ०.९७०० |
| १२१ | ११ब | ०.३७०० | | | |
| १२१ | १६अ | ०.३३०० | १२१ | १६ | ०.७४०० |
| १२१ | १६ब | ०.३७०० | | | |
| १२१ | २३ | ०.२००० | १२१ | २३ | ०.१८०० |

ठिकाण - माणगांव
दिनांक : २३/०९/२०२५

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग माणगांव**

## उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगांव यांजकडून शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात.-२/दाखणे/एसआर-७०/२०१२ दुरुस्ती, उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/एसआर- ७०/२०१२ दिनांक २६/०३/२०१५, ३/०७/२०२० व २४/०५/२०२२ अन्वये मौजे-दाखणे, ता. माणगांव, जिल्हा - रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) ची अधिसूचना स्थानिक वर्तमानपत्रात सन २०१५ ते २०२२ रोजी प्रसिद्ध झालेली आहे;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसुचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०२०/प्र.क्र.४६/उद्योग-१४ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ अन्वये मौजे-दाखणे, ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील काही सर्व्हे नंबर मधील हिस्से व क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार व पृष्ठ क्रमांक ७ ते १० दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहिर केले आहे;

त्याअर्थी, स्थानिक वर्तमानपत्रात सन-२०१५ ते २०२२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(१) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**
**पाणसई औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा - रायगड, ता. माणगांव, गांव- दाखणे**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र(हे.आर) | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र(हे.आर) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| १४ | २ | ०.०४८० | १४ | २ | ०.०९९० |
| १९ | अ | ०.३६७० | १९ | ३+७+१० | ०.७३४० |
| १९ | ब | ०.३६७० | | | |
| ९७ | ५ | ०.०२१० | ९७ | ५ | ०.१२०० |
| ९७ | ३० | ०.०२०० | ९७ | ३० | ०.११०० |
| १११ | ३३ | ०.१८०० | १११ | ३३ | ०.२८०० |
| ११२ | २८ | ०.४६०० | ११२ | २८ | ०.५३०० |
| ११३ | २४ | ०.०४०० | ११३ | २४ | ०.१३०० |
| ११३ | ३२ | ०.४८०० | ११३ | ३२ | ०.४९०० |
| ११५ | ३३अ | ०.३४०० | | | |
| ११५ | ३३ब | ०.२१०० | ११५ | ३३ | ०.९५०० |
| ११५ | ३३क | ०.२२०० | | | |
| ११६ | २४ | ०.०२० | ११६ | २४ | ०.१७० |
| ११६ | ५८ | ०.५४०० | ११६ | ५८ | ०.५५० |
| ११७ | ३६अ | ०.८००० | ११७ | ३६ | १.०१०० |
| ११७ | ३६क | | | | |
| ११७ | ३६ब | ०.२१०० | १२१ | १० | ०.६५०० |
| १२१ | १० | ०.६५०० | | | |
| १२१ | ११अ | ०.४८०० | १२१ | ११ | ०.९७०० |
| १२१ | ११ब | ०.३७०० | | | |
| १२१ | १६अ | ०.३३०० | १२१ | १६ | ०.७४०० |
| १२१ | १६ब | ०.३७०० | | | |
| १२१ | २३ | ०.२००० | १२१ | २३ | ०.१८०० |

ठिकाण- माणगांव
दिनांक २३/०९/२०२५

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी**
**माणगांव उपविभाग माणगांव**

कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

## प्रवाशांच्या खिश्याला कात्री लागणार

**मुंबई :** ऐन सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या खिशाला कात्री लागणार आहे. दिवाळीनिमित्त एसटीच्या तिकिटात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय एसटी महामहामंडळाने घेतला आहे. या निर्णयामुळे प्रवाशांच्या खिशाला आर्थिक भुर्दंड बसणार आहे. वातानुकूलित आणि शिवाई बस सेवा वगळता सर्व बस सेवांसाठी १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान हा निर्णय लागू असणार आहे. १४ ऑक्टोबरच्या मध्यरात्री १२ वाजल्यापासून ही भाडेवाढ लागू करण्यात येईल, असे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे. ज्या प्रवाशांनी आधीच आरक्षण केले असेल त्यांना सुधारीत दराप्रमाणे तिकिट दरातील फरक वाहकाकडे भरावा लागेल.

## लातूर जिल्ह्यात भूगर्भातून गूढ आवाज

**लातूर :** जिल्ह्यातील काही भागांमध्ये मागील काही महिन्यांपासून भूकंपाचे सौम्य धक्के आणि गूढ आवाज तसेच कंपन अनुभवास येत असल्याची माहिती स्थानिकांनी जिल्हा प्रशासनाला कळविली आहे. जिल्ह्यातील निलंगा, शिरूर अनंतपाळ, औसा, रेणापूर, लातूर तालुका इत्यादी भागांत गूढ आवाज येत आहेत. याप्रकरणी प्रशासनाने तज्ज्ञांकडून वैज्ञानिक तपासणी आणि मार्गदर्शन मिळावे, अशी मागणी केली आहे.राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने नोंदविलेल्या माहितीनुसार, २३ सप्टेंबर रोजी मुरुड अकोला येथे २.३ रिश्टर स्केल, २४ सप्टेंबर रोजी हासोरी परिसरात २.४ रिश्टर स्केल आणि २६ सप्टेंबर रोजी बोरवटी परिसरात २.२ रिश्टर स्केल तीव्रतेचे भूकंपाचे धक्के नोंदवले गेले.

**वे|ध|क**

### थेरोंडा समुद्रकिनारी अनोळखी मृतदेह

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील थेरोंडा खंडेरावपाडा येथील समुद्रकिनारी शनिवारी (दि.२७) एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह सापडला. हा मृतदेह अरबी समुद्राचा लाटेबरोबर वाहत आला असण्याची शक्यता स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. मृतदेह बराच कालावधीत समुद्राच्या पाण्यात असल्यामुळे, तो जलचर प्राण्याने कुरतडलेला व अत्यंत कुजलेल्या अवस्थेत आहे. या अनोळखी व्यक्तीचे वय अंदाजे ४० वर्षे असून उंची सुमारे १६० सेमी व अंगात हिरव्या रंगाचा गोल गळ्याचा हाफ टिशर्ट घातलेला आहे.

### वेश्याव्यवसाय रॅकेटचा पर्दाफाश

**रेवदंडा :** सीबीडी बेलापूर सेक्टर १५ येथील मॅजिक मोमेंट वेलनेस स्पा या मसाज सेंटरच्या आड सुरु असलेल्या वेश्याव्यवसाय रॅकेटचा नवी मुंबई पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. यावेळी १५ महिलांची सुटका करण्यात आली असून या रॅकेटचा मास्टरमाईंड असलेला स्पा मालक व त्याचा सफाई कर्मचारी यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. शनिवारी (दि.२७) संध्याकाळी त्याठिकाणी धाड टाकण्यात आली. आरोपींना पोलीस कोठडी सुनावली आहे.



# पाणी पुरवठा योजनेत भ्रष्टाचार ?

**| रायगड | | जिल्हा प्रतिनिधी |**

- कामे न करताच बीले काढण्याचा प्रकार उघड
- ठेकेदारासह अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी

कुर्डूस येथील शिवाजी नगर येथे पाणी पुरवठा योजनेची कामे न करताच बिले काढण्यात आल्याचा आरोप आत्माराम पाटील यांनी केला आहे. काम केल्याचे खोटे पुरावे दाखवून लाखो रुपयांचीलुट करण्यात आली आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात लेखी तक्रार करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, यामध्ये सहभागी असणारे ठेकेदार, संबंधित विभागाचे अधिकारी यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

> **“कुर्डूस येथील शिवाजी नगरमधील पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु आहे. आतापर्यंत पाईपलाईनचे काम पुर्ण झाले आहे. निधी अभावी काही कामे थांबली आहेत. उर्वरित कामे प्रगती पथावर असून ती लवकरच पुर्ण होतील. या कामात कोणताही भ्रष्टाचार केला नाही. इस्टीमेंट पेक्षा अधिक काम केले आहे.**
> **– आदर्श कार्लेकर, ठेकेदार”**

आत्माराम पाटील यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील कुर्डूस येथील शिवाजी नगर येथे पाणी पुरवठा योजना २०२४ मध्ये मंजूर करण्यात आली होती. १४ मार्च २०२४ मध्ये या योजनेचा कार्यारंभ झाला. ठेकेदार आदर्श कार्लेकर यांना या कामाचा ठेका देण्यात आला. एमआयडीसी ते विठ्ठल मंदिर शेजारी इएसआर पंपिग मशिनरी बसविणे, पाईपलाईन टाकणे, पाण्याची टाकी उभारणे, फिल्टर प्लॅट बांधणे ही कामे होती. परंतु, ठेकेदाराने कोणतीहीच कामे न करता कामे केलेली खोटी कागदपत्रे दाखवून कामे केल्याची बिले काढली आहेत. लाखो रुपयांची लुट ठेकेदाराने करून शासनाची फसवणूक केली असल्याचा आरोप ग्रामस्थ मंडळ शिवाजी नगरच्यावतीने आत्माराम पाटील पान ६ वर

> **“कुर्डूस येथील शिवाजी नगर येथे पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली आहे. या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. जितके काम केले आहे, त्या कामांचे बील देण्यात आले आहे.**
> **– निहाल चवरकर, उपअभियंता, अलिबाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग”**

# शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या



**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

- शेकाप तालुका शेतकरी सभेची मागणी
- जिल्हाधिकाऱ्यांना शेकाप शिष्टमंडळाचे निवेदन

रायगड जिल्ह्यामध्ये २६ ते २८ सप्टेंबर या कालावधीत जोरदार पाऊस पडला. या वादळी पावसामुळे भात पिकांसह बागायतदारांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अलिबाग तालुक्यातील सुमारे ५ हजारहून अधिक हेक्टरचे नुकसान झाले आहे. हजारो शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला आहे. पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या, अशी मागणी शेकाप तालुका शेतकरी सभेच्यावतीने करण्यात आली आहे. शेतकरी सभेचे तालुका अध्यक्ष अनिल पाटील यांच्यासह शेकापच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची मंगळवारी (दि.३०) भेट घेऊन त्यांना याबाबतचे निवेदन दिले आहे.

अलिबाग तालुक्यामध्ये वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या भातपीकांचे तसेच बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. संपूर्ण शेती पाण्याखाली गेली आहे. तयार झालेली पिके वादळी वाऱ्यामुळे आडवी पडली आहेत. संपूर्ण शेतीचा भाग जलमय झाला असून हातातोंडाशी आलेला घास गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्याच्यावर उपासमारीची वेळ येण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

शेतकऱ्यांच्या या प्रश्नाबाबत शेतकरी कामगार पक्षाने आवाज उठविला आहे. शेकाप अलिबाग तालुका शेतकरी सभा अध्यक्ष अनिल गोमा पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकाप शिष्ट मंडळाने अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे यांची मंगळवारी (दि. ३०) भेट घेतली. त्यांना निवेदन देऊन आठ दिवसांत पंचनामे पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या, अशी मागणी केली आहे. अन्यथा शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, रायगड जिल्हा चिटणीस पान ६ वर

## चौकमध्ये वडापावमध्ये आढळली पाल

**| रसायनी | प्रतिनिधी |**

वडापाव खाताना ग्राहकाला वड्यामध्ये पाल आढळल्याने सोमवारी (दि.२९) चौक गावात मोठी खळबळ माजली होती. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी हॉटेल बंद पाडले.



मिळालेल्या माहितीनुसार, चौक बाजारपेठेत उजाला हॉटेलमध्ये सोमवारी (दि.२९) भरत वाघ हे नाश्ता करण्यासाठी गेले होते. यावेळी वडापाव खाताना त्यांना तोंडात काहीतरी वेगळे जाणवल्याने त्यांनी वडा कुस्करून पाहिला असता त्यात पाल मृतावस्थेत आढळून आली. या घटनेनंतर येथील ग्राहकांनी हॉटेलमालकाला जाब विचारला असता त्याने उडवाउडवीचे पान ६ वर

## अलिबाग-रोहा रस्ता खड्डयातच

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्ता स्वखर्चाने तयार करून देण्याची बतावणी आमदार दळवी यांनी केली होती. परंतु, प्रवाशांसह नागरिकांची घोर निराशा दळवींनी केली असून अलिबाग-रोहा रस्ता खड्ड्यातच असल्याचे चित्र आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून हा रस्ता जीवघेणा ठरत आहे. खड्डे



चुकविताना वाहनांचा अपघात होत आहे. आमदारांनी दिलेला शब्द पाळला नसल्याने नागरिकांसह प्रवासी वर्गाकडून संतापाची लाट उसळली आहे.

> **“अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्यांचे काम वेळेवर होत नसल्याबाबत जेआरए कंपनीला नोटीस बजावण्यात आली आहे.**
> **– मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग”**

अलिबागपासून रोहा साईपर्यंत ८४ किलो मीटरच्या रस्त्यासाठी सुमारे १७० कोटी रुपयांचा निधी शेकापच्या माध्यमातून पान ६ वर

## बंद्याना व्यावसायिक धडे

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

- जिल्हा कारागृहाचा स्तुत्य उपक्रम

कारागृहातून सुटका झाल्यावर बंद्यांना रोजगाराचे साधन खुले व्हावे, म्हणून अलिबागमधील जिल्हा कारागृहामार्फत व्यावसायिक प्रशिक्षणाचा स्तुत्य उपक्रम कारागृहामध्ये राबविण्यात आला. या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून ३५ हून अधिक बंद्यांनी सहभाग घेऊन व्यावसायिक धडे घेत आहेत.

गुन्हेगारापासून बंदी दूर राहवे, त्यांना रोजगाराचे दालन निर्माण व्हावे. रोजगाराच्या माध्यमातून कुटूंबाचा उदरनिर्वाह व्हावा, हा उद्देश समोर ठेवून अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व पान ६ वर



# केवळ मतांशी मतलब

एखादे राज्य दिवाळ्यात निघाले तरी चालेल पण निवडणुका काय वाटेल ते करून जिंकल्याच पाहिजेत असा भाजपचा पण आहे. त्यानुसार कोणत्याही राज्यात विधानसभा किंवा इतर निवडणुका लागल्या की रेवड्यांची बरसात सुरू होते. अशाच रेवड्या वाटून महाराष्ट्र भिकेला लागण्याची वेळ आली. लाडक्या बहिणींचे कौतुक करता करता आता सरकारला दर महिन्याला धाप लागू लागली आहे. तरीही भाजपची सत्तेची हवस भयंकर आहे. त्यामुळेच बिहारसारख्या आधीच दरिद्री असलेल्या राज्यात पुन्हा महाराष्ट्रासारखाच प्रयोग करण्याचे चालू आहे. बिहारमध्ये येत्या दोन महिन्यात निवडणुका होतील. त्यासाठी तिथे पैशांची लयलूट चालू झाली आहे. प्रत्येक घरातील किमान एका महिलेला प्रत्येकी दहा हजार रुपये देण्याची योजना तिथे जाहीर झाली आहे. अशा तब्बल ७५ लाख महिलांना पैसे वाटण्याचा कार्यक्रम गेल्या आठवड्यात पंतप्रधानांच्या हस्ते झाला. महाराष्ट्रात दर महिन्याला दीड हजार रुपये दिले गेले. बिहारमध्ये आता हाताशी वेळ नसल्याने एकदम दहा हजार रुपये दिले गेले. बिहारचे दरडोई वार्षिक उत्पादन सुमारे ६७ हजार आहे. म्हणजे महिन्याला ते जेमतेम साडेपाच हजार रुपये होते. अशा राज्यात काहीही न करता प्रत्येक कुटुंबात दहा हजार रुपये येणे ही मोठीच गोष्ट असेल. साहजिकच असे पैसे देणाऱ्यालाच मते दिली जाण्याची शक्यता अधिक आहे. याचाच अर्थ येत्या निवडणुकीत मते विकत घेण्यासाठी नीतीशकुमार व नरेंद्र मोदी यांच्या पक्षांनी मिळून दिलेली ही लाच आहे. यातून रोजगार उभे राहतील, विकास होईल अशी पतंगबाजी कोणी कितीही करावी. पण आजच्या काळात दहा हजार रुपयांमध्ये फार तर भाजी किंवा चहा विकण्याचा व्यवसायच करता येऊ शकेल. पण छोट्या गावांमध्ये घराघरांमधून अशा बायका विक्रेत्या झाल्या तर त्यांच्या वस्तू घेणार कोण, हा खरा प्रश्न आहे. त्याऐवजी, हे पैसे शिक्षणासाठी, आजारपणासाठी, कर्जे फेडण्यासाठी किंवा रोजच्या खर्चांसाठीच खर्च होण्याची शक्यता अधिक आहे. नीतीश व मोदींनाही हे पुरते ठाऊक आहे. पण त्यांना केवळ मतांशी मतलब आहे.

## रेवड्याच रेवड्या

महाराष्ट्रात दर महिन्याला दीड हजार याप्रमाणे किमान १८ हजार रुपये महिलांना मिळाले आहेत. हे पैसे कशावर खर्ची पडले याचा अभ्यास राज्य सरकारने केलेला नाही. तो झाला तर हवेतले इमले आणि वस्तुस्थिती यांच्यातील अंतर स्पष्ट होईल. पण भाजपचा डोळा कायम पुढच्या निवडणुकीवर असतो. महाराष्ट्रात आता पालिका व जिल्हा परिषद निवडणुका होणार आहेत. त्यामुळे लाडकी बहीण योजनेतील गैरव्यवहार किंवा भानगडींची चर्चा होणार नाही. बिहारमध्ये तर ही योजना जाहीर करूनही लोक मते देतीलच याचा भरवसा नीतीश व मोदी यांना वाटत नाही. त्यामुळे त्यांनी आणखीही अनेक रेवड्या हवेत उडवल्या आहेत. बिहारची लोकसंख्या महाराष्ट्राइतकीच म्हणजे सुमारे तेरा कोटी आहे. मात्र तिथली गरिबी भीषण आहे. राखीव जागा हा परवलीचा शब्द आहे. एकूण नोंदणीकृत २०३ जातींपैकी १९६ जातींना राखीव जागांचा फायदा मिळतो. एकूण लोकसंख्येत ओबीसींचे प्रमाण ३६ टक्के व दलितांचे २२ टक्के आहे. पण यांना देण्याइतक्या सरकारी नोकऱ्या नाहीत. शिक्षणाच्या सोई नाहीत. त्यामुळे प्रवेशांमध्ये राखीव जागा असूनही फार फायदा नाही. जे हुशार असतात ते विद्यार्थी इतर राज्ये किंवा दिल्लीत जातात. पण ते सर्वांनाच परवडत नाही. या स्थितीत बिहारमध्येच राहून कसेतरी जीवन जगणे त्यांच्या नशिबी येते. निवडणुका ही त्यांच्यासाठी पर्वणी ठरते. राजकीय मंडळी तेव्हाच आपल्या थैल्या खुल्या करतात व हातापाया पडतात. तोच हंगाम आता आलेला आहे. राज्यातील दलितांसाठीच्या योजना राबवण्यासाठी गावागावात विकासमित्र नेमलेले आहेत. त्यांना आता सरकारतर्फे २५ हजार रुपयांचा लॅपटॉप किंवा टॅब फुकट दिला जाणार आहे. तरुण पिढीला मोबाईल, टॅब अशांमध्ये गुंतवून ठेवणे आवश्यक आहे अन्यथा ते रस्त्यावर उतरतात हा धडा शेजारच्याच नेपाळने बिहारला घालून दिलेला आहेच. त्यापासून मोदी-नीतीश यांनी चांगलाच बोध घेतला आहे. त्यामुळेच बहुदा अंगणवाडी सेविका व शिक्षणसेवकांनाही फुकट स्मार्टफोन्स दिले जाणार आहेत.

## भाजपविरोधी वातावरण

याखेरीज इतरही अनेक आमिषे दाखवली गेली आहेत. राज्यात सुमारे दीड कोटी महिला बचतगटांशी जोडलेल्या आहेत. त्यांना स्वस्तात कर्जे दिली जाणार आहेत. एक ऑगस्टपासून प्रत्येक घराला २०० युनिटपर्यंत फुकट वीज दिली जाणार आहे. म्हणजे बहुसंख्य घरांमध्ये आता वीजबिल शून्य येईल. नव्या वकिलांना तीन वर्षे दरमहा पाच हजार रुपये दिले जाणार आहेत. पोलिसांच्या तब्बल २१ हजार जागा एका दिवसात भरण्यात आल्या. विधवा, अपंग इत्यादींचा दरमहा भत्ता चारशेवरून थेट १००० वर नेण्यात आला आहे. थोडक्यात सगळीकडे नोटा उधळल्या जात आहेत. हे पैसे येणार कुठून हा प्रश्न कोणीही विचारायचा नाही. बिहारमध्ये उद्योगधंदे जवळपास नाहीत. टाटांचे जमशेदपूर वगैरे होते ते झारखंडमध्ये गेले. खाणीही तिकडेच गेल्या. म्हणून तर गेल्या निवडणुकीत बिहारसाठी विशेष आर्थिक पॅकेजची मागणी करण्यात आली. त्या पॅकेजचे काय झाले हे आता कोणी विचारत नाही. नीतीशकुमार भ्रमिष्ट झाले आहेत. त्यांना समोरच्या माणसांची नावे आठवत नाहीत. मोदी दिसले की ते त्यांना वारंवार नमस्कार करीत राहतात. आपण त्यांच्या दयेवरच जगतो आहोत असे नीतीश यांना वाटते. नीतीश यांच्या पक्षाला खलास करून यावेळी भाजपची सत्ता आणण्याचे मोदींचे स्वप्न आहे. हिंदी पट्ट्यातले बिहार हे असे एकमेव राज्य आहे जिथे भाजपला स्वबळावर सत्ता मिळालेली नाही. दुसऱ्या बाजूला काँग्रेस व लालू यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाने तगडे आव्हान निर्माण केले आहे. खरे तर राजद गेल्याच वेळी सत्तेत आला होता. पण नीतीश यांनी नेहमीच्या सवयीने दगाबाजी केली. आता मात्र भाजप युतीविरोधात तीव्र वातावरण आहे. त्यातच व्होटचोरीच्या आरोपांमुळे मोदी बदनाम झाले आहेत. राहुल व तेजस्वी यांच्या यात्रांना तुफान प्रतिसाद मिळाला आहे. तेवढी मते पडली तर भाजपची हार नक्की आहे. त्यातच प्रशांत किशोर यांच्या तिसऱ्या पक्षाने चांगली हवा केली आहे. किशोर हे सध्या तरी भाजप व नीतीश यांची मते खातील असे दिसते आहे. त्यातही किशोर यांच्या पक्षाकडे नीतीश यांची मते गेली व नीतीश यांचा पक्ष खलास झाला तर ते भाजपला हवेच आहे. प्रशांत किशोर यांना नंतर विकत घेता येऊ शकते. त्यांनी पूर्वी मोदींसोबत काम केलेले आहेच. हा सर्व हिशेब लक्षात घेऊनच मोदींच्या रेवड्या वाढत चालल्या आहेत. उद्या बिहार खड्ड्यात गेला तरी चालेल, पण सत्ता आपलीच हवी असा हा सगळा प्रकार आहे.

विचार

# पूर्वोत्तर राज्यात विकासाची पहाट

***ईशान्य भारत आता 'विकसित भारत'च्या स्वप्नाचा एक महत्वाचा भाग बनला आहे. पूर्वी हा प्रदेश अशांतता आणि बंडखोरीसाठी ओळखला जात होता; परंतु गेल्या ११ वर्षांमध्ये येथे हळूहळू परिवर्तन होत आहे. चांगले रस्ते आणि रेल्वेसारख्या पायाभूत सुविधांसह हा प्रदेश आता विकास आणि कनेक्टिव्हिटीचे एक मॉडेल बनला आहे. इथे आता वांशिक हिंसाचार आणि धार्मिक तेढीसारख्या मुद्दयांवर नियंत्रण मिळवायला हवे.***




**प्रा. सुखदेव बखळे**

ईशान्येकडील सात राज्ये बंडखोरी आणि हिंसाचाराचे स्रोत होती. त्यामुळे लोकांचे जीवन अत्यंत कठीण झाले होते. अपहरण, खंडणी आणि हल्ले सामान्य होते. विकासकामे ठप्प झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कार्यकाळात ईशान्येकडील राज्यांमध्ये पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला आहे. मोदी यांनी नुकताच आसाम, मणिपूर आदी भागांचा दौरा केला. मणिपूरमधील वांशिक दंगलीनंतर तीन वर्षांनी ते तिथे गेल्यामुळे टीका झाली; परंतु तिथे केली गेलेली विकासकामे आणि नवीन पायाभूत सुविधांमुळे मणिपूरच्याही विकासाचे दार खुले झाले. स्वातंत्र्योत्तर ७८ वर्षांमध्ये एखादे राज्य रेल्वे सेवेपासून वंचित राहते, यावर विश्वासच बसत नाही. सरकारने या राज्यांमधील हिंसाचार मोडीत काढण्यासाठी आणि शांतता पुनर्संचयित करण्यासाठी ठोस पावले उचलली. गेल्या ११ वर्षांमध्ये सरकारने अनेक प्रमुख अतिरेकी गटांसोबत १२ शांतता करार केले आहेत. त्यामुळे दहा हजारांहून अधिक बंडखोर आपली शस्त्रे टाकून समाजाच्या मुख्य प्रवाहात पुन्हा समाविष्ट झाले आहेत. शिवाय, बोडो शांतता करार, ब्रू-रियांग पुनर्वसन करार आणि इतर अनेक महत्त्वाच्या करारांमुळे केवळ शांतता पुनर्संचयित झाली नाही, तर आर्थिक मदतीद्वारे संपूर्ण प्रदेशाला मुख्य प्रवाहात समाविष्ट केले गेले आहे. त्रिपुरामध्ये २०२४ मध्ये झालेल्या 'एनएलएफटी' आणि 'एटीटीएफ'सोबतच्या अलिकडच्या करारामुळे ३५ वर्षांचा संघर्ष संपला आहे. या ऐतिहासिक पावलांमुळे केवळ शांतता बळकट झाली नाही, तर स्थानिक समुदायांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. या शांतता केंद्रित धोरणाचा स्पष्ट परिणाम म्हणजे ईशान्येकडील बहुतेक भागांमधून सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा (अफ्स्पा) काढून टाकण्यात आला आहे.

आकडेवारीनुसार २०१४ ते २०२४ दरम्यान हिंसाचाराच्या घटनांमध्ये ७० टक्के घट झाली, तर नागरी आणि सुरक्षा दलांच्या चकमकीमध्ये अनुक्रमे ८९ टक्के आणि ७० टक्के घट झाली. ती सरकारच्या एकत्रित प्रयत्नांच्या यशाचे प्रतिबिंब आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखाली, सरकारने अनेक प्रमुख धोरणात्मक सुधारणा अंमलात आणल्या आहेत. २०१५ मध्ये 'पूर्वेकडे पाहा'वरून 'पूर्वेसाठी कृती करा' अशा धोरणात्मक बदलामुळे ईशान्येकडील भाग एका दुर्गम सीमावर्ती प्रदेशातून आग्नेय आशियाचे एक महत्त्वाचे प्रवेशद्वार बनले. 'कलादान मल्टीमोडल ट्रान्झिट ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट' आणि बांगलादेशसोबत आगरतळा-अखौरा रेल्वे लिंक यासारखे मोठे प्रकल्प सीमापार संपर्क मजबूत करत असून व्यापार आणि हालचालींना चालना देत आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखाली, ईशान्य भारतात विकास निधी, पायाभूत सुविधांचे बांधकाम, रोजगाराच्या संधी आणि सांस्कृतिक पुनर्जागरणात लक्षणीय वाढ झाली आहे. अर्थसंकल्पाने या प्रदेशाला महत्त्वपूर्ण आधार दिला आहे. २००४-०५ ते २०१३-१४ दरम्यान मिळालेल्या रकमेच्या तुलनेत ईशान्येसाठी सकल अर्थसंकल्पीय सहाय्य (जीबीएस) २०८ टक्क्यांनी वाढले आहे. २०१४ ते २०२४ दरम्यान ईशान्येसाठी वाटप केलेले दहा टक्के जीबीएस बजेट ३८१ टक्क्यांनी वाढले आहे.

मूलभूत गरजा आणि रोजगाराशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी या प्रदेशासाठी 'पीएम-डिव्हाईन'सारख्या विशिष्ट योजना ६६०० कोटी रुपयांच्या बजेटसह राबवल्या जात आहेत. प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्येही या प्रदेशाने चांगली प्रगती केली आहे. सौभाग्य योजनेंतर्गत ईशान्येकडील आठही राज्यांमधील शंभर टक्के घरांना वीजपुरवठा करणे आणि 'हर घर जल' योजनेंतर्गत जवळजवळ सर्व घरांना पाणीपुरवठा करणे ही विकासाची प्रमुख उदाहरणे आहेत. २०१४ पासून सामाजिक पायाभूत सुविधांमध्येही लक्षणीय गुंतवणूक करण्यात आली आहे. मणिपूरमध्ये भारतातील पहिले राष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करणे, आसाममध्ये पहिले एम्स रुग्णालय उघडणे आणि आसाममध्ये एकाच दिवशी सात नवीन कर्करोग रुग्णालयांचे उद्घाटन करणे हे या बदलाचे भक्कम पुरावे आहेत. ईशान्य भारतातील सर्वात मोठा आणि सर्वात दृश्यमान बदल म्हणजे कनेक्टिव्हिटी. 'उडान' योजनेअंतर्गत या प्रदेशातील हवाई सेवांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. २०१४ पर्यंतच्या ६८ वर्षांमध्ये फक्त नऊ विमानतळ होते; परंतु आता ही संख्या १७ झाली आहे. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीमदेखील पहिल्यांदाच हवाई मार्गाने जोडले गेले आहेत. अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, मिझोराम आणि मणिपूर या राजधान्या ब्रॉडगेज रेल्वेने जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे ही राज्ये देशाच्या इतर भागांशी थेट जोडली गेली आहेत. बोगीबील आणि ढोला-सादिया पूल, मैत्री सेतू आणि सेला बोगदा यासारख्या प्रमुख प्रकल्पांमुळे प्रवास सोपा आणि जलद झाला आहे. बोगीबील पुलामुळे आसामच्या धेमाजी जिल्ह्यात १,२०० कोटींपेक्षा जास्त किमतीचे नवीन प्रकल्प सुरू झाले आहेत.

या विकासामुळे या प्रदेशाची दुर्गमता कमी होऊन भारताशी घट्ट नाळ जोडली गेली आहे. ईशान्य भारतातील सांस्कृतिक परिवर्तन तितकेच महत्त्वाचे आहे. एके काळी दुर्लक्षित असलेला प्रदेश आता समृद्ध संस्कृतीसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवत आहे. ईशान्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्रासारख्या संस्थांनी नागालँडचा हॉर्नबिल महोत्सव आणि मणिपूरचा सांगाई महोत्सव यासारख्या उत्सवांना प्रोत्साहन दिले आहे. मणिपूरमधील राणी गायदिन्लू यांना समर्पित आदिवासी स्वातंत्र्यसैनिक संग्रहालय आणि दिल्लीतील लचित बोरफुकन यांच्या चारशेव्या जयंती उत्सवासारख्या उपक्रमांमुळे स्थानिक नायकांना राष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. आसाममधील चोरेडिओच्या मोईदाम्सचा 'युनेस्को'च्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्यामुळे या प्रदेशाचा अभिमान आणखी वाढला आहे. मुगा रेशीम, जोहा तांदूळ, तेजपूर लिची, काझी नेमू आणि बोका चावल यासारख्या स्थानिक उत्पादनांना 'जीआय टॅग' मिळाला आहे. त्यामुळे त्यांना चालना मिळाली आहे. ओळख आणि उत्पन्न दोन्ही वाढले आहेत. ही सांस्कृतिक ओळख आणि सुधारित सुविधांमुळे पर्यटनातही वाढ झाली आहे. २०२३ मध्ये १.२ कोटींहून अधिक भारतीय आणि दोन लाख २१ हजार परदेशी पर्यटकांनी ईशान्य भारताला भेट दिली.

विपुल नैसर्गिक संसाधने असूनही शेतीत मागे असलेला ईशान्य भारत आता वेगाने बदलत आहे. 'मिशन ऑरगॅनिक व्हॅल्यू चेन डेव्हलपमेंट'सारख्या योजनांतर्गत १७.३ दशलक्ष हेक्टर जमीन सेंद्रिय शेतीमध्ये रूपांतरित करण्यात आली आहे. त्यामुळे एक लाख ८९ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना थेट फायदा होत आहे. शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी 'एफपीओ' योजनेअंतर्गत २०५ शेतकरी उत्पादक संघटना स्थापन करण्यात आल्या आहेत. त्या या प्रदेशातील १५ हजार पाचशे शेतकऱ्यांना जोडत आहेत. या संघटना शेतकऱ्यांना एकत्र करत आहेत. त्यांची सौदेबाजीची शक्ती वाढवत आहेत. पीक प्रक्रियेत मदत करत आहेत आणि देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्यांचा प्रवेश सुलभ करत आहेत. सिक्कीम या परिवर्तनात आघाडीवर आहे. २०३० पर्यंत एक अब्ज डॉलर्स (अंदाजे आठ हजार कोटी रुपये) किमतीची सेंद्रिय उत्पादने निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठेवून हे आता आंतरराष्ट्रीय सेंद्रिय केंद्र म्हणून विकसित केले जात आहे.

मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकारच्या पाठिंब्यामुळे आणि प्रयत्नांमुळे या प्रदेशाच्या विकास क्षमतेला व्यापक मान्यता मिळत आहे. हे क्षेत्र आता देशांतर्गत आणि देशाबाहेरून गुंतवणूक आकर्षित करत आहे. आसाममधील २७ हजार कोटी रुपयांच्या सेमीकंडक्टर प्रकल्पात २६ हजारांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारसंधी निर्माण करण्याची क्षमता आहे. शिवाय, या प्रदेशातील 'स्टार्टअप इको सिस्टीम' वेगाने वाढत आहे. त्यामुळे ईशान्य भारतात नवीन व्यवसाय संधी निर्माण होत आहेत. गेल्या ११ वर्षांमध्ये ईशान्य भारतातील परिवर्तन ही लवचिकता, सुधारणा आणि नूतनीकरण केलेल्या राष्ट्रीय एकात्मतेची कहाणी आहे. एके काळी दुर्गम मानला जाणारा हा प्रदेश आता भारताच्या २१ व्या शतकातील विकासप्रवासात एक महत्त्वाचा भागीदार बनला आहे. सतत विकास प्रकल्प राबवल्यामुळे आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाल्यामुळे सांस्कृतिक वारशाचा उत्सव झाला आहे. मोदी सरकारने ईशान्येकडील प्रदेश उदयोन्मुख, आकांक्षी आणि समावेशक भारताचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे सुनिश्चित केले आहे.

चर्चा आजची

# जीवघेणा पाऊस, हवालदिल बळीराजा!

**राकेश लोहार**

महाराष्ट्रावरील ओल्या दुष्काळाचे संकट किती मोठे आहे, हे मागील काही दिवसांपासून आपण सातत्याने पाहात आहोत. शेती पाण्यासाखाली गेली असून, पीक जमीनदोस्त झाले आहे. कष्टातून उभं राहिलेले शिवार आज संकटातून वाढ काढणं शेतकऱ्यांकडून शिकावं, असे आपण मोठ्या जिद्दीने म्हणत असतो. परंतु, आज तोच बळीराजा निसर्गाच्या कोपापुढे पुरता कोसळला आहे, खचला आहे. जगाचा पोशिंदा असलेला माझा शेतकरी राजा, पोटाची भूक भागविण्यासाठी पदर पसरतोय, रांगेत उभा राहून मदतीची वाट पाहातोय, इतकी भयाण आणि भीषण अवस्था या पावसाने शेतकऱ्याची आणि त्याच्या कुटुंबाची केली आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी पाऊस जीवघेणा ठरत असून, कोसळणाऱ्या पावसामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. सातत्याने कोसळणाऱ्या पावसामुळे काबाडकष्टाने पिकविलेली शेती पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. कापणीयोग्य भातशेतीचेही मोठे नुकसान झाले आहे. कापणीला आलेले भातपीक मातीमोल झाल्याने शेतकरी संकटात आहे. पाऊस एखाद्या वैऱ्यासारखा कोसळतोय. आणि, नेतेमंडळी पाहणी दौरे करीत सुटलेत. त्यांचे ताफेच्या ताफे सध्या दुष्काळाची पाहणी करीत असताना साऱ्यांचे लक्ष त्यांच्याभोवतीच फिरत आहे. ऑफिसातल्या केबिनमध्ये शांत बसा आणि अधिकाऱ्यांना फक्त नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी काम करु द्या, त्यामुळे गरजू शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळेल. जर अधिकारी नेत्यांच्या मागे धावत राहिले, तर हातची कामे तशीच राहतील. आणि, नुकसानग्रस्त शेतकरी मात्र मदतीपासून ताटकळत राहील. याचा तरी दौऱ्यावर जाणाऱ्या मंत्र्यांनी विचार करावा. सर्वच मंत्री जबाबदार आहेत, परंतु, सर्वांनी न जाता एखाद्यानेच जाऊन शेतकऱ्यांना धीर दिला तर बरं होईल.

राज्यभर कोसळणारा पाऊस बळीराजाची पाठ सोडायला तयार नाही. या पावसाने पुन्हा शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणले आहेत. वर्षागणिक काढणीला आलेल्या पिकांचे पावसामुळे होणारे नुकसान वाढत चालले आहे. गेल्या चार वर्षांपासून शेतकरी अस्मानी आणि सुलतानी संकटांनी पूर्णपणे पिचला गेला आहे. यामुळे शेतकरी देशोधडीला लागले आहेत. हवामान विभागाकडून आता सूचना मिळू लागल्या आहेत. मात्र, सरकारकडून त्याप्रमाणात उपाययोजना करण्यात अपयश येत आहे. त्याचा फटका शेतीला पर्यायाने शेतकऱ्यांना बसत आहे. यात मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडून गेले आहे. यामुळे शेतकरी मेटाकुटीस आले आहेत. पावसामुळे नुकसानीचा फास शेतकऱ्यांभोवती घट्ट झाला आहे. अर्थकारण कोलमडल्याने राज्यभरातील शेकडो शेतकरी आज आत्महत्येची भाषा बोलू लागले आहेत. गेल्या तीन वर्षांतील आकडेवारी बघितली तर पावसाने धुमाकूळ घालत शेतकऱ्याला उद्ध्वस्त केले आहे. त्यावेळी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करण्यात आले, मात्र योग्य ती नुकसानभरपाई मिळालेली नाही. यासाठी सरकारने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. नुकसान होऊनही मदत न मिळालेल्या शेतकऱ्यांना जोपर्यंत आर्थिक मदत मिळत नाही, तोपर्यंत त्यांच्यावर सुलतानी संकट कायम राहणार आहे.

'सरकारी काम अन् बारा महिने थांब' या म्हणीचा नेहमी प्रत्यय येत असतो. कुठलेच सरकारी काम वेळेवर होत नाही. नुकसानीची मदत मिळण्यास शेतकऱ्यांना वर्षभर वाट पाहावी लागते. मदत मिळण्याचेही सरकारने निकष तयार केले आहेत. हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने दुर्दैव म्हणावे लागेल. आजवर सरसकट मदत कधीच मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे जगायचं कसं, असा प्रश्न निर्माण झाला आहे. अवकाळी पाऊस आणि गारपीट हे शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेले आहे. त्यामुळे त्याला शेतकऱ्याला दरवर्षी बळी पडावे लागत आहे. भारताकडे उपग्रह तंत्रज्ञान बनविण्याचे आधुनिक तंत्रज्ञान आहे, पण शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अद्याप हवा त्या प्रमाणात होत नाही. त्यासाठी आपले सरकार आणि वैज्ञानिकांनी कृषीकेंद्री होण्याची गरज आहे. आज पाश्चिमात्य देशांमध्ये आधुनिक पद्धतीने शेती करण्यात येते, तिथेही अवकाळी पाऊस आणि गारपीट, वादळं अशी संकटं येतात, पण तिथे त्या पिकांना कसे संरक्षण दिले जाते, याचा विचार व्हायला हवा.

आपल्याकडे शेतकरी आत्महत्या हा राजकीय बाजूने बघण्याचा विषय झाला आहे. कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेत आले तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत, हे निर्विवाद सत्य आहे. परंतु, अस्मानी संकटाचा शेतकऱ्यांनाच नेटाने सामना करावा लागेल. पीकविमा योजनेच्या माध्यमातून मिळणारी थोडीफार रक्कम तरी पदरात पडेल यादृष्टीने स्वतःच उपाययोजना कराव्या लागतील. शासकीय यंत्रणा कागदी घोडे नाचवण्यात धन्यता मानतात. त्यामुळे त्यांच्याकडून फार अपेक्षा न ठेवलेल्या बऱ्या. प्रत्येकवेळी संकट आले की, सरकारी यंत्रणेच्या नावाने रडत बसण्यापेक्षा संकटांचा धैर्याने सामना केला तरच शेतकऱ्यांचा निभाव लागेल. कारण, सरकारकडून मदतीच्या घोषणांचा पाऊस तुफान पडेल, यात शंका नाही. पण, त्याची वाट पाहात बसण्यापेक्षा, शेतकऱ्यांनी न खचता पुन्हा कामाला लागावे, हेही सत्य कोणीही नाकारु शकत नाही. आणि, हेच वास्तव आहे. कितीही तुफान आले, तरी शेतकरी ना कधी खचला, ना मागे हटला. शेतीत कष्टासाठी पुन्हा उभा राहील, यातही शंका नाही.

लोकसंसद

# महाराष्ट्र वाल्मिकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ गदिमा यांची आज १०६ वी जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले. त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि. स. खांडेकर यांची सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढली. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे. तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही 'मराठी चित्रकथा' या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले; अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. पुढचे पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी, सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला.

**-श्याम ठाणेदार**

दिनविशेष

# स्वैच्छिक रक्तदान.. सेवा पंधरवडा..

'स्वस्थ नारी, निरोगी परिवार' या अभिमान अंतर्गत 'सेवा पंधरवडा' म्हणून आरोग्याच्या दृष्टीने केंद्र सरकार तसेच राज्य सरकार मा. मुख्यमंत्री, मा. आरोग्यमंत्री, यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्वत्र राबविण्यात येत आहे. 'सेवा पंधरवडा' हा राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्म दिनाच्या औचित्य साधून राबविण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या सेवाभाव तत्त्वज्ञानाचा आणि मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विकासाभिमुख विचारांचा हा संगम साधणारा उपक्रम असून, महाराष्ट्र शासन प्रशासनाला लोकाभिमुख, कार्यक्षम आणि अधिक पारदर्शक करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'स्वस्थ नारी निरोगी परिवार' हे विशेष अभियान सर्वत्र देशात तसेच महाराष्ट्रातील जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी शिक्षित करणे आणि त्यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे आहे. महिला व बालकांसाठी हे विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करून प्रत्येक आयुष्यमान आरोग्य अभियानात आणि अंगणवाडीमध्ये आरोग्य तपासणी, मार्गदर्शन शिबिरे भरवण्यात येत आहेत. या 'सेवा पंधरवडा'च्या निमित्ताने सर्वत्र स्वैच्छिक रक्तदान शिबीर अभियान राबविण्यात येत आहे.

**स्वैच्छिक रक्तदान आणि एड्स प्रतिबंध व नियंत्रण जनजागृती:-** केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मा. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई तसेच मा. संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद यांच्या स्वैच्छिक रक्तदान अभियानाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्ह्यात जिल्हाधिकारी तसेच मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अधिपत्याखाली जिल्हा रुग्णालय अलिबाग अंतर्गत एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग यांच्या विद्यमाने 'इंटिसिफाईड आयईसी कॅम्पेन' अभियान अंतर्गत 'एचआयव्ही/एड्स' या आजाराविषयी जनजागृती आणि रक्तकेंद्रामार्फत 'राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान' अभियान जनजागृतीचे महान कार्य राबविण्यात येत आहे. १ ऑक्टोबर 'राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस' दरवर्षी स्वैच्छिक रक्तदान अभियान म्हणून साजरा केला जातो. याचा मुख्य उद्देश समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या वाढवणे आणि सुरक्षित रक्तपुरवठ्यासाठी स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व पटवून देणे हा आहे. लोकांना स्वैच्छिक रक्तदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी 'सेवा पंधरवडा'च्या निमित्त-ने जनतेच्या सेवेसाठी, राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी राबविण्यात येत आहे. या वर्षीच्या शासनाचे घोषवाक्ये आहे 'रक्त देऊया, आशा जागवूया, एकत्रितपणे जीव वाचवूया...।' १ ऑक्टोबर १९७५ रोजी हा दिवस सर्व प्रथम साजरा करण्यात आला होता.

**माझे स्वैच्छिक रक्तदान का महत्त्वाचे:-** थॅलेसेमिया, हिमोफिलिया, प्रसूती, अपघात, रक्तक्षय, इ. रुग्णांसाठी रक्त हे 'लाईफ लाईन' आहे. अशा रुग्णांना नेहमी रक्ताची गरज असते. अशा रुग्णांचा जीव वाचविण्यासाठी माझे रक्तदान अमूल्य आहे. बोन मॅरोमध्ये नवीन रक्त तयार करण्याची कार्यक्षमता वाढते. रक्तदान प्रक्रियेत रक्तदानाची सुरक्षितता काटेकोरपणे पाळली जाते. त्यामुळे कोणत्याही इजा किंवा आजार होण्याची शक्यता नसते. मानवी रक्ताला पर्याय नाही कारण 'रक्त' हे कृत्रिमरित्या प्रयोगशाळेत तसेच कारखान्यात तयार करता येत नाही. तसेच जास्त दिवस साठवूनही ठेवता येत नाही. त्यामुळे माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाचेच रक्त द्यावे लागते. दान केलेले रक्त शरीरात नैसर्गिकरित्या भरून निघते. माझ्या स्वैच्छिक रक्तदानाने एखाद्या रुग्णांचे प्राण वाचवू शकतो. माझे रक्तदान सुरक्षित, आनंददायी तसेच वेदनारहित असते. नियमित रक्तदानाने शरीरातील कोलेस्टेरॉल व रक्तदाब नियंत्रित तसेच कॅन्सरसारख्या आजाराचा धोका कमी राहतो. सामाजिक बांधिलकी ठेवून, देशाचा नागरिक म्हणून रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी या मोहिमेत सहभागी व्हावे आणि समाजात रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी, एवढाच उद्देश.

**हेमकांत सोनार ,रक्तपेढी तंत्रज्ञान**

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



## भिसेगावची अंबामाता



कर्जत रेल्वे स्थानकापासून अगदी दोन-तीन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या भिसेगाव मध्ये श्री अंबे भवानी मातेचे मंदिर आहे. नवसाला पावणारी जागृत देवस्थान अशी या स्थळाची प्रचीती आहे. कर्जत नगरपरिषद हद्दीत असलेले भिसेगाव हे गाव भिसे खिंडीच्या पायथ्याशी आहे.

पूर्वी या ठिकाणी खूप जंगल होते. व्यापारी वर्ग व्यापारासाठी मुंबई - पुण्याकडे जातांना याच खिंडीच्या मार्गाने जात. हे व्यापारी खिंडी जवळ असणाऱ्या विहिरीजवळ रात्री मुक्काम करून सकाळी पुढील प्रवासाला निघत. डोंगर माथ्यावर आदिवासी लोकांची वस्ती होती. एके दिवशी एका गुजराथी व्यापाऱ्याला मुक्कामाला असतांना स्वप्न पडले. स्वप्नात देवीने दर्शन दिले. ममी या विहिरीजवळ असलेल्या वारूळात आहे. मला त्यातून बाहेर काढ, माझ्या सोबतीला एक काळा नाग आहे. तो तुम्हाला काही करणार नाही. या दृष्टांताकडे लक्ष न देता तो व्यापारी तेथून पुढे निघून गेला. काही दिवसांनी पुन्हा या ठिकाणी तो व्यापारी मुक्कामास आला असता त्याला तसाच दृष्टांत झाला. हा सर्व वृत्तांत त्याने आपल्या व्यापारी मित्रांना सांगितला. त्यावेळी त्या सर्व व्यापारी वर्गाने मिळून ते ठिकाण शोधण्याचे ठरविले. डोंगर माथ्यावर राहणाऱ्या आदिवासींना मदतीला बोलून घेतले. सर्वजण वारूळ फोडण्यासाठी जमले असता त्या वारुळातून काळा नाग बाहेर आला व कुणालाही काहीही न करता बाहेर निघून गेला. त्यानंतर आदिवासी लोकांनी वारूळ फोडले, तर काय आश्चर्य खरोखर देवीची सुंदर रेखीव मूर्ती त्यातून बाहेर पडली. ती मूर्ती पाहून सर्वांना आनंद झाला,आदिवासी व व्यापारी यांनी सावली म्हणून देवीच्या डोक्यावर छप्पर तयार केले. तेंव्हापासून व्यापारी येता जाताना देवीची पूजा करून दर्शन घेऊन आपापल्या कामाला जात असत.

## राबगावची आई वरदायिनी माता



वाकण पाली राज्य मार्गावर असलेल्या राबगाव येथे प्रसिद्ध जागृत श्री वरदायिनी मंदिर आहे राबगाव ग्रामस्थांची कुलस्वामिनी श्री वरदायिनी माता असल्याने येथे नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मंदिरात घटस्थापना करून नऊ दिवस माळा सोडविल्या जातात चैत्र पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. पाली सह तालुक्यातून भक्तगण देवीच्या दर्शनाला येतात. मात्र, नवरात्र उत्सवात घटस्थापना करून नऊ दिवस देवीला माला चढवले जाते.

उंच डोंगर टेकडीवर निसर्ग कुशीत श्री वरदायिनी आईचे मंदिर असल्याने येथे आल्यावर अतिशय प्रसन्न वाटते मंदिरासमोर सरस गडाचे दर्शन होते तर उजव्या बाजूला बारमाही वाहत असलेले आंबा नदी आहे बाजूला वृक्षवल्ली असून मंदिराच्या समोर विशाल जुनाट वटवृक्ष आहे. तेथे वटपौर्णिमेला गावातील स्त्रिया वडाला बुजून वटपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करतात. मंदिराच्या मागच्या बाजूला तलाव असून बाजूला पूर्ण माळरान व बहरलेली हिरवीगार भातशेती आहे. हिरवेगार डोंगर भाग असल्याने येथे आल्यावर खऱ्या अर्थाने कोकण भागाचे दर्शन घडते. अतिशय भक्तीभावाने राहणारे येथील बरेचसे ग्रामस्थ वारकरी संप्रदायाची आहेत. मंदिराच्या मागच्या बाजूला साधारणतः २५० वस्तीचे छोटेसे राबगाव असून तेथे मोठा शेतकरीवर्ग आहे. या गावात विविध देवतांचे मंदिरेआहेत. वरदायीनी मातेला छोटेखानी गाभारा मंदिर असून या देवीच्या मंदिराला मध्येच ठेवून येथील दानशूर उद्योजक मारुती गणपत पडवळ यांनी मोठे मंदिर येथे उभारले आहे.यामध्ये देवीच्या मागच्या बाजूला काळकाई माता, गणपती, भैरी भैरोबा, नंदी व शिवलिंग अशा देवतांचे स्थाने आहेत. त्यामुळे या मंदिरात आल्यावर सोबत सर्व देवतांचे दर्शन घडते. राबगावग्रामस्थांची कुलस्वामिनी म्हणून गावाला वेगळी ओळख करून देणारी माता म्हणजे श्री आई वरदायीनी माऊली गावाची ग्रामदेवता आहे.

## मुशेतमध्ये सीसीटीव्हीचे उद्घाटन

**। सोगांव । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील मुशेत येथील जाधव पाडा येथे मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्या वतीने सीसीटीव्ही बसविण्यात आले.

या कार्यक्रमास अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष सुनिल थळे, केशव चांदोरकर, सातीर्जे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजाभाऊ ठाकूर, प्राची ठाकूर, समद कुर, लाईक कप्तान, अनिल जाधव, संजय शिंदे, अण्णा सातमकर, राजेंद्र घरत, सानिका घाडी, प्राजक्ता जाधव, प्रफुल्ल थळे, विवेक जोशी, सुरेश राऊत, सुधाकर ठकरुळ, सूचित थळे, अनिल अनमाने, किशोर नागावकर, सतिश घाडी, संतोष बांद्रे, प्रविण घाडी, मुनावर कुर, अजित हरवडे, सम्राट ठाकूर, रूपेश अनमाने, गीतेश ठकरुळ, निकेश अनमाने, अक्षय जाधव, परेश सुर्वे, प्रतिक अनमाने, शलाका थळे आदी मान्यवर व मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील तसेच मुशेत गावातील ग्रामस्थ महिला व पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित हरवडे यांनी केले.

### क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **विज्ञान विषय शिक्षक पाहिजेत.** आपण इयत्ता आठवी नववीचे सायन्स शिकवू शकता का? उत्तर होय असल्यास त्वरीत आपला अर्ज सादर करा. shikshaknokri@gmail.com
- दुकानात कामासाठी तसेच पॅकींगसाठी मुलगी पाहिजे. संपर्क :७०६६१३८३६८
- स्टॉलवर नाश्ता बनविण्यासाठी बाई/मुलगी पाहिजे. संपर्क : ७३७८४८०१५१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# कर्जतकरांवर प्रकल्पाचे भूत

## कंपनीच्या नवीन प्रकल्पाला ग्रामस्थांचा विरोध

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात टाटा कंपनीचा जलविद्युत प्रकल्प असून हाच प्रकल्प आता नव्याने विस्तारला जात आहे. १००वर्षे जुन्या असलेल्या या प्रकल्पामधून अधिक क्षमतेने वीज निर्मिती व्हावी यासाठी टाटा कंपनीकडून नवीन प्रकल्प उभारला जात असून तब्बल एक हजार मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दरम्यान, स्थानिकांना ॲक्शन प्लान नुसार कोणत्याही सुविधा न देणाऱ्या टाटा जलविद्युत प्रकल्पाला ग्रामसभा घेऊन विरोध दर्शवला असून सहा ऑक्टोबर पासून उपोषणाला बसण्याचा निर्णय स्थानिकांनी घेतला आहे.

सर जे आर डी टाटा यांनी १९०७ मध्ये पुणे जिल्ह्यात आंध्रा धरण बांधले आणि या धरणातील पाणी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे वळवून त्या पाण्यावर वीज निर्मिती केली. भिवपुरी येथे जलविद्युत केंद्र बांधून या ठिकाणी निर्माण होणारी वीज मुंबईकडे पाठवणाऱ्या टाटा कंपनीकडे भिवपुरी भागातील शेकडो एकर जमीन आहे. त्या ठिकाणी वीज निर्मिती झाल्यानंतर पाणी कर्जत तालुक्यातील दुबार शेतीसाठी आणि नंतर ठाणे जिल्ह्यात पोहचते. त्यामुळे टाटा जलविद्युत प्रकल्प कर्जत आणि ठाणे जिल्ह्यासाठी पाण्याची वाहिनी समजली जात आहे. याच टाटा कंपनीकडून भिवपुरी येथील २०० एकर जमिनीवर बंधारा बांधून डोंगरातून वाहून जाणारे पाणी अडवले जाणार आहे. त्या पाण्यावर तब्बल एक हजार मेगावॅट विजेची निर्मिती केली जाणार आहे. एक हजार कोटी खर्चाच्या या प्रकल्पाचे काम सुरू झाले असून या प्रकल्पामुळे अपेक्षित असलेल्या सुविधा मिळत नसल्याने स्थानिकांनी आता उपोषणाचे हत्यार उपसण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी विशेष ग्रामसभा घेण्यात आली असून ग्रामस्थांनी शासनाला या ग्रामसभेचा अहवाल पाठवून दिला आहे.




### कंपनीची मनमानी

**घटना आणि कायद्याच्या नियमांच्या अधीन राहून गृप ग्राम पंचायत टाटा पॉवर कंपनीस संपूर्ण सहकार्य करीत नाहीत. त्याचवेळी कंपनी मनमानी करुन स्थानिक शेतकरी असलेल्या प्रकल्पग्रस्तांना नोकरी तसेच काम न देता बाहेरील राज्यातील कामगारांना आणून कामे देण्यात प्राधान्य दाखवत असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे.त्यामुळे येत्या सहा ऑक्टोबर रोजी ग्रामस्थांचे उपोषणास बसणार आहेत.**

टाटा पॉवर कंपनीकडून मौजे भिवपुरी कॅम्प येथे १००० मेगावॅट क्षमतेचा उदंचन प्रकल्प उभारला जात आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने मंजूर केला असून त्यामध्ये जनसुनावणी दरम्यान ग्रुप ग्रामपंचायत भिवपूरी (कॅम्प) ने सादर केलेल्या अहवालातील सर्व योजनांचा तसेच मागण्यांचा टाटा पॉवर कंपनीने सदर योजना या आपल्या सामाजिक दायित्व योजनेतून पूर्ण केल्या जातील असे आश्वासन दिले होते.त्याचवेळी केंद्र सरकारच्या वन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालयाने सदरहू योजना विशिष्ट आणि मानक अटी शर्ती घालूनच पर्यावरण मंजुरी दिली होती. मात्र या अटीची पूर्तता न झाल्यास मंजुरी रदद करण्यात येईल असे स्पष्टपणे नमूद केले आहे. तसा ना हरकत दाखला देण्यात आला होता आणि रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून त्यावर पक्ष ठेवण्याच्या सूचना केंद्र सरकारच्या वन आणि पर्यावरण मंत्रालय यांच्याकडून देण्यात आल्या होत्या. जुलै २०२५ मधील ग्रामसभेत ग्रामपंचायत हद्दीतील शाळा अंगणवाडी, सोलर लाईट सोलर पैनल, रस्ते, पाणी, आरोग्य या मुलभूत सुविधांचे एकही कार्य त्यांनी केंद्र सरकारला दिलेल्या ॲक्शन प्लान नुसार कामे केली असल्याचा ठपका ग्रामस्थांनी ठेवला आहे. तर स्थानिक शेतकरी असलेल्या प्रकल्पग्रस्तांना नोकरी तसेच काम न देता बाहेरील राज्यातील कामगारांना आणून कामे देण्यात हेमंत नवले, दत्तात्रय नवले, मनोज मोरमारे,मनोज शितोळे, बजरंग घाडगे, संतोष घाडगे, शिवाजी दिसले, तानाजी करडे, स्वप्निल भोसले यांनी दिली आहे.

( पान ३ वरुन)

## शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या

मंडळाचे सदस्य अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या अतिवृष्टीमध्ये खारेपाट विभागातील भातशेतीचे १०० टक्के नुकसान झाले आहे. उथळी व गोडी जमीनीतील भात पिकालादेखील मोठा फटका बसला आहे. सुमारे ५ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्र बाधीत झाल्याची माहिती अनिल पाटील पाटील यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळण्यासाठी प्रशासनाने हालचाल सुरु करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी अनिल पाटील, नरेश गोंधळी, उदय वेळे, सुर्यकांत म्हात्रे, प्रदिप पाटील, रविंद्र पाटील, मोतीराम पाटील, विनोद पाटील आदी शेकाप पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाणी पुरवठा योजनेत भ्रष्टाचार ?

यांनी केला आहे. कुर्डूसमधील शिवाजी नगर परिसरात कामाची कोणतीही सुरुवात झाली नसताना, ठेकेदाराने काम पुर्ण झाल्याचे दाखवून ८ ऑक्टोबर २०२४ मध्ये ८ लाख ५० हजार रुपयांची वसूली केली असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे याबाबत अनेकवेळा तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कारवाई, तसेच तक्रारदारांना माहिती देण्यात आली नाही. त्यामुळे या प्रकरणात ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांचादेखील सहभाग असल्याचा आरोप केला जात आहे. ग्रामस्थांना पाण्यावाचून तडफडत ठेवून खोटी कागदपत्रे तयार करून ठेकेदाराला देयक देण्यात आले आहे. या कामात मोठा भ्रष्टाचार झाला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे ठेकेदारांसह कार्यकारी अभियंता यांच्याविरोधात पोलीसांत तक्रार केली जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

## अलिबाग-रोहा रस्ता खड्ड्यातच

मंजूर करण्यात आला होता. २०१९ मध्ये विधानसभा निवडणूकीपूर्वी अलिबाग-रोहा रस्ता स्वखर्चाने करून देईन, असे आश्वासन दळवी यांनी दिले होते. नागरिकांनी विश्वासाने रस्त्यासाठी त्यांना निवडून दिले. त्यानंतर अनेक वेळा बेलकडे फाट्यावर नारळ वाढविण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. प्रत्यक्षात मात्र कामाला काही मुहर्त लागला नाही. भाजप आणी शिंदे गटात श्रेयवाद झाल्यावर अखेर गेल्या दोन वर्षापासून या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. खानाव ते धसाडे कुणे पर्यंतचा रस्ता काँक्रीट करण्यात आला. मात्र, खानावपासून वेलवली खानाव, धसाडे कुणे ते उसर, वावे, सुडकोली या परिसरातील रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. कोट्यावधी रुपये खर्च करून रस्त्यावरील खडी उखडली असल्याने दुचाकी वाहने घसरून अपघात होत असल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. विद्यमान आमदारांनी अनेक वेळा या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन केले. परंतु, पाच वर्षात हा रस्ता पुर्ण करण्यास अपयशी ठरल्याचे चित्र आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवासी वर्गाकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. खड्डेमय रस्त्यामुळे अलिबाग सुडकोली मार्गावरील प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. अनेक वेळा एसटी बसेसदेखील या रस्त्यावर बिघडत आहेत. आमदारांनी दाखविलेले स्वप्न ते स्वप्नच राहिल्याची प्रतिक्रीया जनमानसातून उमटत आहे.

## बंद्याना व्यावसायिक धडे

विषेश कारागृह महानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली बंद्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षणाचा उपक्रम राबविण्यात आला. जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात आला. अलिबागमधील जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता श्री रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट यांच्यामार्फत इलेक्ट्रॉनिक्स वस्तू रिपेअरिंगचे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. कारागृहातील ३५ बंद्यांनी प्रशिक्षणात उस्फूर्तपणे सहभाग घेतला असून प्रशिक्षणाच्या माध्यमातून एसी, फ्रिज, वाशिंग मशिन, टिव्ही, मिक्सर, ग्राईंडर, गिझर हिटर,आदी वस्तूंच्या दुरुस्तीचे प्रशिक्षण बंद्यांना देण्यात येणार आहे.

## चौकमध्ये वडापावमध्ये आढळली पाल

उत्तर दिले. त्यामुळे ग्राहकांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, या घटनेनंतर चौकमधील जागरूक ग्रामस्थांनी हॉटेलमालकाला हॉटेल बंद पाडण्यास भाग पाडले. याअगोदरदेखील येथील हॉटेलमधील खाद्यपदार्थात झुरळ आढळले होते. आता पाल आढळल्याने अन्न प्रशासन विभागाकडे तक्रार करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सुरेश गावडे यांनी सांगितले.




● विभा पाटील, आचल पाटील -परहूरपाडा.



सोनाली दांडेकर -पेझारी.



दिपाली पाटील, परहूरपाडा.



श्रीमती. धुमाळ पेझारी.



● ॲड. मनीषा नागावकर-लोहार, चौलमळा



●नवरात्रोत्सव उत्सव मंडळ भंडारवाडा



● सखी ग्रुप नागांव हायस्कूल.



● भगत परिवार मु.भिलजी.





● सी.के.टी. विद्यालय इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभाग, नविन पनवेल.



● आग्रावकर ग्राफीक्स, अलिबाग



●अंकुर प्री स्कुल विद्यालय अलिबाग



● आई कृष्णादेवी महिला मंडळ, चौलमळा



● महिला व बाल कल्याण विभाग रायगड जिल्हा परिषद



● पेंढाबे बिट क्र.१ च्या अंगणवाडी सेविका



● जय मल्हार गृप-शहाबाज



● मनश्री गायकवाड, वाशी



● चैत्राली गायकवाड वाशी



● आरती पाटील, कामोठे



● रायगड पोलीस दलातील महिला पोलीस कर्मचारी


शुभेच्छुक
RDCC Bank
Let's grow together
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
श्री. विजय कृष्णा गिदी
संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
माजी चेअरमन, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबई


RDCC Bank
Let's grow together
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
स्व. महेश देशमुख
नागरी सहकारी पतसंस्था, अलिबाग
चेअरमन - ॲड. श्री. परेश अ. देशमुख
व्हाईस चेअरमन - श्री. वैभव पाटील
सेक्रेटरी - श्री. महेंद्र पाटील
सर्व संचालक, व्यवस्थापक, कर्मचारी वर्ग


कु. प्रांशी क्रितेश शेळके
दिनांक ०१-१०-२०२५
(वावे-अलिबाग)
प्रथम वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
पुजा मम्मी, क्रितेश पप्पा, उज्वला आजी, बाळकृष्ण आजोबा, करिष्मा आत्या, रोशन मामा, अंश दादा, ताई, मामा-मामी, आजी-आजोबा, काका-काकी, अंकिता ताई, मावशी-काका, तसेच सर्व शेळके, कडवे, भोपी, तुरे, कासकर, ठाकूर, शिंदे परिवार-आप्तेष्ठ, नातेवाईक व मित्रमंडळ


रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
RDCC Bank
Let's grow together
शुभेच्छुक
श्री. संदेश शंकर ठाकूर
व्हाईस चेअरमन, विविध कार्यकारी सहकारी संस्था कणे
सरपंच - वाशी ग्रामपंचायत


रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
माझे दैवत
शुभेच्छुक
श्री. संतोष हरिभाऊ पाटील
संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
माजी संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती पनवेल
मु. हरिग्राम, पो.मोरबे, ता. पनवेल मो. ९९३०२४६५२४


रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
श्री. प्रदिप नाईक
कामगार आघाडी प्रमुख
शेतकरी कामगार पक्ष


RDCC Bank
Let's grow together
ISO 9001:2008 BANK
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. प्रशांतशेठ नाईक
संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
मा. नगराध्यक्ष, अलिबाग नगर परिषद


RDCC Bank
Let's grow together
ISO 9001:2008 BANK
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. सुरेशशेठ खैरे
उपाध्यक्ष, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
चिटणीस, शेतकरी कामगार पक्ष रायगड जिल्हा


RDCC Bank
Let's grow together
ISO 9001:2008 BANK
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा.श्री. राजेंद्र जुईकर
अध्यक्ष
मा.श्री. अजित नामदेव भगत
उपाध्यक्ष
रा.जि.सह. बँक कर्मचारी संघ


RDCC Bank
Let's grow together
ISO 9001:2008 BANK
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या
६५ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा.श्री. सतिष देशमुख
चेअरमन
मा.श्री. अजित भगत
व्हा. चेअरमन
मा.श्री. राजेंद्र जुईकर
सचिव
संचालक मंडळ
मा.श्री.कमळाकर तुकाराम वाघमोडे-संचालक
मा.श्री. भारत रामचंद्र नांदगांवकर-संचालक
मा.श्री.संजिव श्रीकांत देशमुख- संचालक
मा.श्री.संदेश तुकाराम पाटील- संचालक
मा.श्री.अब्दूल हाफिज मापकर - संचालक
मा.श्री.सुरेंद्र गौरु शिर्के- संचालक
मा.श्री.संतोष हरिभाऊ चौलकर- संचालक
मा.श्री. रुपेश प्रकाश म्हात्रे- संचालक
मा.श्री. मधूकर मामू ढेबे- संचालक
मा.श्री.नितिन विजय चांदोरकर- संचालक
मा.सौ.समिता सुनिल पाटील- संचालिका
मा.श्रीम.सोनल चंद्रकांत कमाने- संचालिका
दि. रायगड बँक स्टाफ को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.पेण

# रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक: ६५ वर्षांचा गौरवमयी प्रवास

देशात सध्या ३५१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. यामध्ये सातत्याने रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही अग्रेसर बँक म्हणून लोकप्रिय झालेली पाहायला मिळते. शासनाच्या वतीने जिल्हा बँकेचे कामकाज अधिक व्यापक असावे याकरिता सहकारमहर्षि असलेल्या रायगड जिल्हा बँकेचा गौरव अनेक व्यासपीठावरून होताना अनेकांनी अनुभवला आहे. जिल्ह्यातील सहकारी संस्था असो वा राज्यातील सहकारी बँका, पतसंस्था तसेच सहकारी संस्था सदैव रायगड जिल्हा सहकारी बँकेच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करीत असतात. सक्षम नेतृत्व, उत्कृष्ट व्यवस्थापन, कौशल्यपूर्ण कर्मचारी यांच्यासोबत सर्व आधुनिक सेवा याद्वारे रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने देशातील अग्रगण्य जिल्हा सहकारी बँक म्हणून शेतकऱ्यांचा आणि ग्राहकांचा विश्वास जिंकून त्यांचा आर्थिक साथीदार ठरली आहे. महाराष्ट्र सारख्या सहकार समृद्ध असलेल्या राज्यातील सहकारी परंपरेची जपणूक करणारी आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या स्वप्नाला प्रत्यक्ष रूप देणारी ही बँक यंदा आपल्या गौरवमयी ६५ वर्षांच्या प्रवासाला गाठली आहे.





### कुलाबा ते रायगड

अर्थात या प्रवसाची सुरुवात ३० सप्टेंबर १९६० रोजी नोंदणीने झाली असली, तरी संचालक मंडळाचे अधिकार हाती घेण्याआधी काही प्रक्रिया पार पाडणे आवश्यक होते. पोटनियमांत तत्कालीन रजिस्ट्रार साहेबांनी काही बदल सुचवले आणि पहिले संचालक मंडळ सभासदांनी निवडले गेले. संचालक मंडळाची निवडणूक ६-७-१९६१ रोजी पार पडली व बोर्डाची पहिली सभा ७-८-१९६१ रोजी झाली. १-१०-१९६१ पासून बँकेचा कारभार हाती घेण्याचे ठरवण्यात आले. लागलीच महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेला हा निर्णय कळविण्यात आला, कारण त्या काळात ही बँक आपल्या जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करत होती. १७-८-१९६१ रोजी बोर्डाच्या बैठकीत महाराष्ट्र स्टेट बँकेचे मॅनेजर डॉ. श्रीमाळ यांनी बँकेच्या कारभाराला मान्यता दिली. सुरुवातीस काही संचालक अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेला भेट देऊन कार्याची माहिती घेतली. २-१०-१९६१ रोजी महात्मा गांधी जयंतीच्या मुहूर्तावर तत्कालीन सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, बाळासाहेब भारदे यांच्या शुभहस्ते उद्घाटन झाले. अर्थात त्यावेळी बँकेचे नाव कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असे होते. १९८१ सालापासून बँकेचे नाव रायगड किल्ल्याच्या नावावरून केलेल्या बदलाप्रमाणे रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणून लोकप्रिय झाले. त्या काळात शेतकऱ्यांसाठी कर्ज मिळवणे कठीण होते, प्राथमिक सहकारी संस्था कमी प्रमाणात कार्यरत होत्या आणि ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक व्यवहारांमध्ये सुविधा कमी होत्या. अशा परिस्थितीतही, रायगड बँकेने शेतकऱ्यांचा विश्वास जिंकत त्यांचा मजबूत आर्थिक साथीदार म्हणून स्थान निर्माण केले आणि आजही ही बँक संकल्पबद्ध पद्धतीने प्रगती करत आहे.

आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद

या दीर्घ प्रवासात अनेक आव्हाने आलीकधीकधी आर्थिक संकटे, कधीकधी तंत्रज्ञानातील मागासपणा, तर कधीकधी व्यवस्थापन आणि संस्थात्मक सुधारणांची गरज. पण प्रत्येक आव्हानाला संधीमध्ये रूपांतरित करण्याची दृष्टी आणि कठोर परिश्रम बँकेच्या नेतृत्वाची ओळख बनली. बँकेने प्रत्येक टप्प्यावर ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकऱ्यांच्या गरजा आणि सहकारी मूल्यांचा समन्वय साधून निर्णय घेतले, ज्यामुळे केवळ आर्थिक वाढच नव्हे तर सामाजिक समृद्धी देखील सुनिश्चित झाली.

### अध्यक्ष व नेतृत्वाचा प्रभाव

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६५ वर्षांच्या गौरवमयी प्रवासात अध्यक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. स्थापनेपासूनच बँकेने सक्षम आणि दूरदृष्टीने नेतृत्व प्रदान करणाऱ्या व्यक्तींना आपल्या संचालक मंडळात निवडले.सर्वात दीर्घकालीन कार्यकाळ जयंत पाटील (१७/०३/१९९७ आजतागायत) यांचा असून, त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेने तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि शेतकरी कर्ज व्यवस्थापन यामध्ये उल्लेखनीय प्रगती साधली आहे. अर्थात जयंत पाटील यांचे प्रभावशाली नेतृत्वाने बँकेला दिलेली ओळख हा बँकेचा सुवर्णकाळ ठरला आहे तर दुसरीकडे, सुरुवातीच्या काळात, नारायण यशवंत नेने (१९६१-१९६८) यांनी शेतकरी कर्जव्यवस्था आणि प्राथमिक सहकारी संस्थांच्या संलग्नतेला स्थिर पाया दिला. अल्पकालीन कार्यकाळ व्ही. एस. जाधव (१९६८-१९६९) यांचा असून त्यांनी बँकेच्या प्रारंभिक टप्प्यातील संघटनात्मक स्थिरता सुनिश्चित केली. त्यानंतरचे नेतृत्व, जसे की एच. एम. वांगरे (१९६९-१९७३) आणि के. बी. पाटील (१९७३-१९७६) यांनी बँकेच्या विस्तार आणि ग्रामीण भागातील सेवांवर भर दिला. १९७९-१९८३ पर्यंत एन. एम. दलवी आणि १९८३-१९८५ पर्यंत बी. डी. कदम यांचे नेतृत्व बँकेच्या व्यवस्थापकीय कार्यक्षम तेला वाणिज्यिक स्थिरता प्रदान करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले. १९८५-१९९१ दरम्यान चंद्रकांत देशमुख यांचा कार्यकाळ बँकेच्या सामाजिक बांधिलकीवर आणि सहकारी संस्थांच्या सशक्तीकरणावर लक्ष केंद्रित करणारा होता. १९९१-१९९७ पर्यंत रघुनाथ शंकर पाटील यांनी बँकेच्या धोरणात्म क वाढीला चालना दिली, आणि भाई जयंत पाटील यांचा कार्यकाळ गेल्या २८ वर्षांपासून सुरू असून, त्यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली बँकेने राज्यातील सहकारी बँकिंगमध्ये प्रसिद्धी आणि विश्वासार्हता मिळवली आहे. या सर्व चेअरमनांच्या योगदानामुळे बँकेने सुरक्षित, विश्वासार्ह आणि ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणारी संस्था म्हणून आपले स्थान कायम राखले आहे.

**मंदार वर्तक**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

### व्यवस्थापकीय स्थिरता

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व्यवस्थापनात कार्यक्षम आणि दूरदृष्टीने नेतृत्व असलेले अधिकारी महत्त्वपूर्ण ठरले आहेत. सुरुवातीस द. दी. तोतडे (१९६१-१९६५) आणि व. त्र्यं. अग्निहोत्री (१९६५-१९६८) यांनी बँकेच्या प्रारंभिक संस्थात्मक स्थिरतेस हातभार लावला. प. वी. म्हात्रे (१९६८-१९८८) यांचा दीर्घकालीन कार्यकाळ बँकेच्या धोरणात्मक विकासासाठी आणि ग्रामीण भागातील सेवा विस्तारासाठी निर्णायक ठरला. त्यानंतर ए. डी. निपाणीकर, व्ही. ए. देवरे, एस. व्ही. पाटील, व्ही. एस. शिंदे, ए. डी. कारभारी, डी. बी. खोत, ए. के. जोशी, आर. एम. पाटील यांनी विविध काळात बँकेच्या व्यवस्थापकीय क्षमता, पारदर्शकता आणि आर्थिक स्थिरता सुनिश्चित केली. २००७ पासून प्रदीप नाईक यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बँकेला आधुनिक तंत्रज्ञान, कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि कर्ज व्यवस्थापनात उंचावले तसेच बँकेच्या प्रतिमेला अधिक व्यापकरूप दिले, तर मे २०२२ पासून व्यवस्थापनातील शिकवणुकीप्रमाणे हा गौरवशाली उत्कृष्ट वारसा जपून, बँकेच्या धोरणात्मक विस्तारास गती देण्याचे काम माझ्याद्वारे सुरू असून बँकेचा विश्वासार्ह आणि प्रगतिशील चेहरा राज्यात आणि देशात कायम ठेवण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. अर्थात याचे संपूर्ण श्रेय अध्यक्ष मा.आमदार जयंत पाटील आणि सर्व सन्मानिय संचालक मंडळ यांना जाते. बँकेचे सर्व अधिकारी, व्यवस्थापकीय नेतृत्वामुळे बँकेने सुदृढ, पारदर्शक आणि विश्वास मिळवणारी संस्था म्हणून आपले स्थान राखले आहे असा माझा ठाम विश्वास आहे.

### आधुनिकता

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तंत्रज्ञान स्वीकारताना सहकारी बँकिंग क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित केले आहेत. २००० साली संपूर्ण शाखा स्वयंचलन (Total Branch Automation) सुरू करून सर्व शाखांमध्ये व्यवहार पूर्णपणे ऑटोमेट केले गेले, आणि २००८ मध्ये कोअर बँकिंग प्रणाली (CBS) अंमलात आणल्यामुळे शाखांचे व्यवहार केंद्रीकृत आणि सुसंगत झाले. स्वतःच्या डेटा केंद्र (Data Center) मुळे डेटा सुरक्षा आणि सातत्यपूर्ण व्यवस्थापन सुनिश्चित झाले. शेतकऱ्यांसाठी बँकेचा एक उल्लेखनीय उपक्रम म्हणजे २०१३ साली देशातील पहिलं के. सी.सी. डेबिट कार्ड (KCC Debit Card) सुरू करणे, ज्यामुळे कर्जाची थेट उपलब्धता झाली आणि डिजिटल व्यवहार सोप्या पद्धतीने करता आले. त्याचबरोबर एटीएम सेंटर्स, क्यू.आर. कोड पेमेंट, आय.एम.पी.एस., नेफ्ट, आर.टी. जी.एस. आणि इतर आधुनिक डिजिटल सेवा ग्रामीण आणि शहरी ग्राहकांना पोहोचवल्या गेल्या. संस्थाचे संगणकीकरण करणारी देशातील पहिली बँक होण्याचा बहुमान देखील २०२४ साली बँकेने मिळविला आहे.पण याच सोबतीला सायबर सेक्युरिटीवर बँकेने प्रचंड मेहनत घेतलेली पाहायला मिळते ज्यामुळे सहकार क्षेत्रातील विश्वास वाढला आहे. सलग पंधरा वर्षांहून शून्य टक्के एन.पी.ए. सातत्यपूर्ण नफा, खडज ९००१:२०१५ प्रमाणपत्र आणि राज्य व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कार हे तिच्या विश्वासार्हतेचे स्पष्ट प्रतीक आहेत. मात्र, फक्त आकडेवारीतली वाढ नव्हे, तर पारदर्शक कारभार, शाश्वत व्यवस्थापन, ग्राहकाभिमुख धोरणे आणि समाजाभिमुख उपक्रमांमुळे रायगड बँक सहकाराचे खरे प्रतीक ठरली आहे. बँकेने तंत्रज्ञानाचा अवलंब करून सुधारणा करण्यास नेहमीच कटिबद्ध राहिले आहे. त्यामुळे केवळ व्यवसायिक प्रगती नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला सशक्त आधार आणि शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासही बँकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. रायगड बँकेच्या ६५ वर्षांच्या गौरवमयी प्रवासात बँकेचे चेअरमन भाई जयंत पाटील यांचे नेतृत्व, संचालकांची सकारात्मक भूमिका, व्यवस्थापन, अधिकारी, आजी माजी कर्मचारी आणि ग्राहक यांच्या सामूहिक योगदानामुळे ही संस्था आजही विश्वासार्हता, प्रगती आणि सहकाराचे प्रतीक म्हणून उभी आहे.

### सामाजिक बांधिलकी बँकेने बचतगट

चळवळीच्या माध्यमातून दोन लाखांहून अधिक महिलांना आर्थिक स्वावलंबनाकडे नेण्याचे कार्य केले आहे. पारंपरिक पापड, लोणच्यापासून सुरुवात करून या महिलांनी ट्रक, जेसीबी चालवण्यापर्यंत आपली धाडसपूर्ण क्षमता सिद्ध केली आहे. कोविड काळात त्यांनी पिपीई किट, मास्क व इतर आवश्यक वस्तू तयार करून अर्थार्जन केले. या उपक्रमांनी ग्रामीण समाजातील स्त्रीशक्तीला उभारी दिली आणि महिलांना आर्थिक निर्णयक्षम बनवण्यास महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यासोबतीला बँकेने लायन्स हेल्थ फाउंडेशनला प्रवासी ने-आण करण्यासाठी अम्ब्युलंस पुरविलीली असून मुख्यमंत्री सहायता निधि असो वा जिल्हा आपत्ति व्यवस्थापन यांच्याकरिता बँकेने सढळ हस्ते म दत केली आहे. जिल्ह्यातील अनेक मंडळांना खेळ,सांस्कृतिक कार्यक्रम यांच्याकरिता देखील बँकेने आर्थिक सहकार्य केले आहे. जिल्ह्यातील अनेक उपक्रमांना बँकेचे केवळ आर्थिक स्वरूपातच नव्हे तर सर्व बाजूने सहकार्य बँकेच्या वतीने होत असते.

### प्रेरणादायी धडा

जेव्हा देशातील अनेक बँका वाढत्या एन.पी.ए., गैरव्यवस्थापन आणि तांत्रिक मागेपणामुळे अडचणीत आहेत, तेव्हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दाखवून दिले आहे की दूरदृष्टी असलेले नेतृत्व, अभ्यासू अधिकारी, झोकून देणारे कर्मचारी आणि सहकारभाव यांमुळे कोणतीही सहकारी संस्था राष्ट्रीयकृत बँकांशीही खांद्याला खांदा लावून स्पर्धा करू शकते. ६५ वर्षांचा हा प्रवास फक्त बँकेचा नाही, तर ग्रामीण समाज, शेतकरी, महिला, छोटे-मोठे व्यवसायिक, ग्राहक आणि कर्मचाऱ्यांनी मिळून उभारलेली सामूहिक विजयगाथा आहे. अर्थात हा प्रवास करताना राज्यातीलच नव्हे तर देशातील एक आदर्शवत जिल्हा सहकारी बँकेचा प्रवास साध्य करण्यासाठी जिल्ह्यातील तसेच राज्यातील ग्राहकांनी दाखविलेला विश्वास आणि बँकेला जयंत पाटील यांचे लाभलेले धाडसी नेतृत्व यामुळे शक्य झाले आहे. बँकेने ६७०० कोटींचा व्यवसाय टप्पा पूर्ण केलेला असून पुढील २ वर्षात बँक १०,००० कोटींहून अधिक व्यवसाय, १००० कोटींपेक्षा अधिकचा स्वनिधी साधण्याचे स्वप्न पूर्ण करत, सर्वाधिक ग्राहकांना जोडून आधुनिक, डिजिटल आणि पारदर्शक सेवा देण्यास कटिबद्ध आहे. या ध्येयाद्वारे बँक ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सशक्त आधार निर्माण करण्यासाठी आणि प्रत्येक ग्राहकाच्या आर्थिक आत्मविश्वासाला प्रोत्साहन देण्यास बँक सतत प्रयत्नशील राहील. **




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)